**आदेश निशाणी क्र. २५ व २७ वर नियमीत दिवाणी दावा क्र. ३९/२०१८**

वादींनी सदरचे अर्ज त्यांच्या मुळ दाव्यामध्ये दुरूस्ती करण्यासाठी व मयत वादी क्र. १ यांचे वारस दाव्यामध्ये सामील करण्यासाठी व अॅबेटमेंटचा आदेश होण्यासाठी दाखल केले आहेत. वादींनी सदरचा दावा हा प्र.वादीं विरूध्द जाहीर होउन मिळण्यासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादींच्या कथनानुसार वादी क्र. १ हे दिनांक २६/०४/२०२१ रोजी मयत पावले. वादींनी अॅबेटमेंट दुर होण्यासाठीचा अर्ज दिनांक ४/१/२०२२ रोजी दाखल केला आहे. देशातील ताळेबंदीमुळे व संसर्गजन्य रोगामुळे वादीने मयत प्र.वादी क्र. १ चे वारस दाव्यामध्ये सामील केले नाही. याउलट, प्र.वादींनी त्यांचे म्हणणे दाखल केले. सदरचा अर्ज खरा नसून कोणतेही कारण घडले नाही. त्यामुळे अर्ज रदद करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज, म्हणणे, दाव्यामधील दस्तावेजांचे अवलोकन केले. वादी व प्र.वादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. त्यानुसार माझासमोर खालील मुद्ये उपस्थित होतात. त्याचे निष्कर्ष मी कारणमिमांसासह खालीलप्रमाणे नोदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्ये** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **०१.** | वादीने मागणी केलेला अनुतोष मिळणेस पात्र आहे काय ? | होय |
| **०२.** | सदर मागणी मंजुर केल्यास, दाव्याचे स्वरूपात बदल होईल काय ? | नाही |
| **०३** | काय आदेश ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

**कारणमिमांसा**

**मुद्ये क्र. १ ते ३ करीता –**

०४. वादीने सदरचा दावा हा जाहीर होउन मिळणेकरीता व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादीच्या म्हणणेप्रमाणे वादी हे दिनांक २६/०४/२०२१ रोजी मयत पावले व वादीने अॅबेटमेंट दुर होण्यासाठीचा अर्ज दिनांक ४/१/२०२२ रोजी दाखल केला आहे. वादीने सदरचा अर्ज हा मुदतीत दाखल केला नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयानुसार दिनांक २३/३/२०२० ते २८/२/२०२२ रोजीपर्यंतचा कालावधी हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे, अॅबेटमेंट दुर होण्यासाठीचा अर्ज हा कालावधीमध्ये दाखल केल्यामुळे मंजुर होण्यास पात्र ठरतो. मयत वादी क्र. १ चे वारस दाव्यामध्ये सामील केल्यास सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपामध्ये कोणताही बदल होणार नाही. वरील कारणमिमांसावरून व मुळ दाव्याचे स्वरूप विचारात घेतले असता, दावा दुरूस्ती केल्यामुळे प्र.वादींचे कोणतेही

नुकसान होणार नाही. त्यामुळे, सदरचा अर्ज मंजुर करण्यास पात्र ठरतो. सबब, मी खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**—:: <u>आदेश</u> ::—**

१ अर्ज नि.क्र. २५ व २७ मंजूर करण्यात येतात.

२ वादींनी मागणीप्रमाणे १४ दिवसांच्या आंत दाव्यात दुरूस्ती करावी व दुरूस्तीची प्रत दाव्यात दाखल करावी.

३ खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( डि.एम.गित्ते )
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कळवण.

ठिकाण :— कळवण.
दिनांक :— ०७/०६/२०२२.